# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
## Maharashtra University of Health Sciences, Nashik
वणी - दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४.
Vani – Dindori Road, Mhasrul, Nashik – 422 004
**EPABX :** 0253-2539100-300, **Fax :** 0253-2539171, **Phone :** 0253-2539173
**E-mail :** sw@muhsnashik.com **Web.:** www.muhsnashik.com

**डॉ. काशिनाथ दा. गर्कळ** — **Dr. Kashinath D. Garkal**
एम.एस्सी., पीएच.डी — M.Sc., Ph.D
**संचालक - विद्यार्थी कल्याण** — **Director – Students' Welfare**


*All correspondence be addressed to the Registrar.*

मआविवि/एसडब्ल्यू/एनएसएस/८५/२०१२ दि. १६/०१/२०१२

प्रति,
**अधिष्ठाता / प्राचार्य,**
सर्व रासेयो महाविद्यालये

**विषय : राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकाऱ्यांसाठी रासेयोच्या परीचय प्रशिक्षणाबाबत...**

महोदय / महोदया,

महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या कामाची जबाबदारी दिलेल्या कार्यक्रम अधिकाऱ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेतील विविध घटकांचा परिचय व्हावा, कार्यप्रणालीबाबत माहिती व्हावी व त्याद्वारे अधिक चांगले काम करण्याची स्फुर्ती व प्रोत्साहन मिळावे यासाठी कार्यक्रम अधिकाऱ्यांनी रासेयोचे एकदा प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे. राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या बऱ्याच महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांनी परिचय प्रशिक्षण घेतलेले नसल्यामुळे महाविद्यालयास अनुदान देवुनही रासेयोचे कार्यक्रम राबविले जात नाही आणि लेखा परीक्षीत हिशोब विद्यापीठास वेळेवर पाठविले जात नाही.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकाऱ्यांसाठी **अहमदनगर कॉलेज, अहमदनगर, इम्पॅनेल्ड ट्रेनिंग इन्स्टिटयुट, राष्ट्रीय सेवा योजना येथे सहा दिवसांचा एक प्रशिक्षण कार्यक्रम असे आर्थिक वर्षात प्रत्येक महिण्यात प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. सन २०११-१२ या आर्थिक वर्षातील उर्वरीत पुढील दोन कार्यक्रमांपैकी एका कार्यक्रमास आपल्या महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्यास नियुक्त करावे.** प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्यांची चहापान, भोजन व निवासाची व्यवस्था अहमदनगर कॉलेज, अहमदनगर यांच्यातर्फे करण्यात येते. परंतु अहमदनगर येथे जाण्या-येण्याचा प्रवास खर्च महाविद्यालयाने करावयाचा आहे. प्रशिक्षण कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी अगोदर टेलीफोनद्वारे नोंदणी करावी व जातांना सोबत प्राचार्यांच्या सहीचे पत्र घेवुन जावे आणि त्याची एक प्रत विद्यापीठास पाठवावी.

| अ. न. | प्रशिक्षण कालावधी | संपर्कासाठी पत्ता |
|---|---|---|
| १ | दि.०६/०२/२०१२ ते ११/०२/२०१२ | प्रो. के. के. कनोजिया, हेड ॲण्ड को-ऑर्डीनेटर (ट्रेनिंग), अहमदनगर कॉलेज, अहमदनगर, इम्पॅनेल्ड ट्रेनिंग इन्स्टिटयुट, राष्ट्रीय सेवा योजना, सीएसआरडी-आयएसडब्लुआर कॅम्पस, स्टेशन रोड, अहमदनगर - ४१४ ००१ फोन- कार्यालय - ०२४१-२३५३२८६, मोबाइल - ९२२६१०२०९३ |
| २ | दि.१३/०२/२०१२ ते १८/०२/२०१२ | |

**रासेयोच्या कार्यप्रणालीबाबत अप्रशिक्षीत असलेल्या सर्व रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांनी एकदा रासेयोचे प्रशिक्षण घेणे अनिवार्य असल्यामुळे ज्या महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांनी रासेयोचे प्रशिक्षण घेतलेले नसेल त्या महाविद्यालयास सन २०१२-१३ या वर्षासाठी अनुज्ञेय असलेले रासेयोचे अनुदान वितरीत केले जाणार नाही तसेच रासेयो एकक बंद केले जाईल याची कृपया नोंद घ्यावी.**

आपला विश्वासू

**सही/-**
संचालक, विद्यार्थी कल्याण तथा
रासेयो समन्वयक